**(महाराष्ट्र पोलीस राजपत्र विभागीय भाग-६ अ करिता)**

क्र.पोमसं/८-अ/स्वी.स-मुफसल/सार्व.बदल्या-२०१७/६७/२०१७ मुंबई दिनांक १२/०५/२०१७

**-: आदेश :-**

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ अन्वये, आणि शासन अधिसूचना, गृह विभाग, क्र.टीआरएन-०३११/१३३५/प्र.क्र.-२९१/पोल-५ब, दि.२९/३/२०११ अन्वये दिलेल्या अधिकारानुसार पोलीस महासंचालकांच्या मुफसल लिपिक संवर्गातील खालील नमुद स्वीय सहायक (गट -ब ) यांची सध्याच्या कार्यालयात ३ वर्ष सेवा पूर्ण झालेली असल्यामुळे प्रशासकीय कारणास्तव स्तंभ ४ मध्ये दर्शविलेल्या कार्यालयात बदली करण्यात येत आहे :-

| अ.क्र. | स्वीय सहायक | सध्याचे नेमणुकीचे कार्यालय | बदलीनंतरचे नेमणुकीचे कार्यालय |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्री.धनंजय मधुसुदन वैद्य | अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य पुणे. | विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर. |
| २ | श्री. दिलीप प्रभाकर गोरीहर | विशेष पोलीस महानिरीक्षक,नक्षल विरोधी अभियान, नागपूर. | विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, नागपूर. |
| ३. | श्री. राजेंद्र रामचंद्र सौंदरकर | विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर. | अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे. |

२. उपरोक्त बदलीच्या आदेशांची अंमलबजावणी तात्काळ व कार्यक्षमरित्या होण्याकरिता खालील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे :-

१. बदलीबाबतचे आदेश प्राप्त झाल्यानंतर पर्यायी स्वीय सहायक हजर होण्याची वाट न पाहता त्यांना बदली टिकाणी हजर होण्यासाठी कार्यमुक्त करावे.
२. बदली झालेल्या, व कार्यमुक्त केलेल्या स्वीय सहायकांना विनाविलंब रुजु करुन घ्यावे, व त्याबाबतचा दिनांक हया कार्यालयास कळवावा. तसेच, त्यांना रुजु करुन न घेतल्यास सक्तीचा प्रतीक्षा काळ ठरवून काम न करता वेतन व भत्ते देण्याचा प्रश्न उद्भवल्यास त्यास संबंधीत घटक प्रमुखास जबाबदार धरण्यात येईल.
३. बदलीच्या आदेशांत बदल करुन घेण्यासाठी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास असे स्वीय सहायक शिस्तभंगविषयक कारवाई करण्यास पात्र ठरतील.
४. बदली झालेल्या स्वीय सहायकांनी त्यांची बदली केलेल्या कार्यालयात दि.३१/५/२०१७ पर्यंत न चुकता रुजू व्हावे.
५. बदलीनंतर जे स्वीय सहायक रुग्ण निवेदन करतील अथवा गैरहजर राहतील त्यांना रुग्ण निवेदनाच्या तारखेपासून स्थित कार्यमुक्त (Stand relieved) करण्यात यावे, व त्यांना कार्यमुक्त केल्याचा आदेश त्यांच्या निवासस्थानी बजावावा.

३. सदरचे आदेश पोलीस महासंचालकांच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

**सतीश माथुर**
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति :

अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर / रा.रा.पो.बल, नागपूर / नक्षल विरोधी अभियान, नागपूर.

प्रत माहितीकरिता :

अपर पोलीस महासंचालक, विशेष कृती, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र. १० व १२.

प्रत,

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक कार्यालय.

२. सदरचे आदेश कृपया पोलीस महासंचालकांच्या संकेतस्थळावर एक महिन्यासाठी उपलब्ध करुन द्यावेत.

(अनुप कुमार सिंह)
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन),
पोलीस महासंचालक यांचे करीता.